महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/१२ वी/परीक्षा/ 3249
कोल्हापुर- ४१६ ००४
दिनांक :- 15 /०९/२०२५

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये
सातारा, सांगली, कोल्हापूर

**विषय** - शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून CBSE व ICSE या बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र कार्यवाहीबाबत...

**संदर्भ** - राज्यमंडळ कार्यालय, पुणे यांचे क्र.रा.मं./संशोधन/2492 दि.10.07.2025 चे पत्र

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य यांना कळविण्यात येते की,

1) शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून CBSE व ICSE या बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र (Eligility) बाबतची कार्यवाही करतांना इ. 11 वी प्रवेशाबाबतची यादी राज्यमंडळ कार्यालय, पुणे, यांचेकडून विभागीय मंडळ कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही संदर्भात यथावकाश कळविण्यात येईल.

2) गतवर्षी CBSE व ICSE बोर्डाचे इ.11वी प्रवेशीत विद्यार्थी या वर्षी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च 2026 साठी प्रविष्ट होणार आहेत. त्यापैकी ज्या विद्यार्थ्यांची योग्यता प्रमाणपत्राची कार्यवाही केलेली नाही त्यांचा नियमानुसार विहित शुल्कासह प्रस्ताव मंडळाकडे सादर करावा तसेच या वर्षी इ.12 प्रवेशीत विद्यार्थ्यांचेही शुल्क रु.1000/- भरणा करुन मंडळ कार्यालयास प्रस्ताव सादर करावा.

3) CBSE व ICSE बोर्डाव्यतिरिक्त इतर बोर्डातील / परराज्यातील / परदेशातील विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र अर्जाची प्रचलित पद्धतीने ऑनलाईन प्रणालीद्वारे मंडळाच्या संकेतस्थळावरुन आवश्यक कागदपत्रे,शुल्क भरणा करुन योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावी.

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 15-09-2025 13:48:13
(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव
कोल्हापुर विभागीय मंडळ कोल्हापूर

प्रत-माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी
मा. शिक्षण उपसंचालक,कोल्हापूर विभाग कोल्हापूर.